रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

उंब्रज, ता.-कराड, जि.- सातारा



ग्रंथालय विभाग

आयोजित

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त

वाचन प्रेरणा दिन

विशेष व्याख्यान-२०२६

॥ वाचू आनंदे ॥



डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

ग्रंथ आमचे साथी
ग्रंथ आमचे हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या
अंधाऱ्या राती

वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचा अहवाल -२०२६

आयोजक

प्रा. विकास बर्गे (ग्रंथपाल)





प्र. प्राचार्य

डॉ. संभाजी गावडे



स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

शुक्रवार, दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२६ **वेळ : सकाळी १०.०० वा.**

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



ग्रंथालय (ज्ञान स्त्रोत केंद्र)

१२/१०/२०२६

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त

वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम

महत्वाची सूचना

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वाचन ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून ती विचारांना दिशा देणारी, कल्पनाशक्ती समृद्ध करणारी आणि व्यक्तिमत्त्व घडविणारी शक्ती आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व "वाचू आनंदे" या विचारातून वाचन संस्कृतीला चालना मिळावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे राहणार असून, सद्गुरू गाडगेमहाराज कॉलेज, कराड येथील संस्कृत विभागाचे विभागप्रमुख प्रा. अनंत निकम यांचे "वाचू आनंदे" या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. तरी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांनी या प्रेरणादायी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

कार्यक्रमाची माहिती


दिनांक: शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६

वेळ : सकाळी १०.०० वाजता

स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

विशेष व्याख्यान : "वाचू आनंदे" , व्याख्याते : प्रा. अनंत निकम

अध्यक्ष : मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे



"वाचनातून विचार, विचारातून व्यक्तिमत्त्व आणि व्यक्तिमत्त्वातून समाजनिर्मिती!"

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



दिनांक: १३/१०/२०२६

महत्वाची सूचना

प्रति,
सर्व विभाग आणि विषयप्रमुख,
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
उंब्रज.

विषय : वाचन प्रेरणा दिनानिमित्त सामूहिक वाचन उपक्रमात सहभागी होण्याबाबत.....

संदर्भ : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र यांचे
(पत्र क्र. SU/BBK KRC/वाचन प्रेरणा दिन/2026/1257, दिनांक १२/१०/२०२६.)

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर हा 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावर्षी 'वंदे मातरम् गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव (१५० वर्षे)' या निमित्ताने श्री. मिलिंद सबनीस लिखित 'समग्र वंदे मातरम्-खंड एक : इतिहास' या पुस्तकातील विद्यापीठाने निश्चित केलेल्या मजकुराचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे.

वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम नियोजन समिती - २०२६

अ. क्र.	नाव	विभाग	पद
१	प्रा. बर्गे व्ही. व्ही.	ग्रंथालय	चेअरमन
२	प्रा. वर्णेकर एम. व्ही.	हिंदी, राष्ट्रीय सेवा योजना	समन्वयक
३	प्रा. गिरी जी. ए.	मराठी	सदस्य
४	डॉ. भोगे डी. बी.	अर्थशास्त्र	सदस्य
५	प्रा. फासे एन. टी.	इंग्रजी	सदस्य
६	प्रा. लाड एस. एम.	इतिहास	सदस्य
७	प्रा. देसाई पी. एस.	वाणिज्य	सदस्य
८	प्रा. जाधव एम. एस.	विज्ञान	सदस्य
९	सौ. पवार एस. एस.	मुख्य लिपिक	सदस्य
१०	कु. साक्षी मनोहर पवार	विद्यार्थीनी (वाणिज्य शाखा)	सदस्य

सर्वांसाठी महत्त्वाच्या सूचना :

१. विद्यापीठाच्या सूचनेनुसार सर्व विद्यार्थ्यांची १००% उपस्थिती बंधनकारक आहे. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे.

२. सामूहिक वाचनासाठी विद्यार्थी व संबंधित सहभागी यांनी निर्धारित ठिकाणी एकत्र बसावे. इतर विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपलब्ध वर्गखोल्यांमध्ये बसून वाचन करावे.

३. वाचनासाठी आवश्यक मजकूर मोबाईल, मोठी स्क्रीन किंवा छापील स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येईल. सर्वांनी सकाळी १०.४५ ते ११.०० या वेळेत १५ मिनिटे वाचन करावे.

४. कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्यात येईल.

५. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC) व संबंधित विभागांच्या सहकार्याने करण्यात येईल.

६. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

७. कार्यक्रमानंतर सहभागींची संख्या, छायाचित्रे व व्हिडिओ यांची नोंद घेऊन विद्यापीठाच्या सूचनेनुसार आवश्यक माहिती सादर करण्यात येईल.

वाचन संस्कृतीचा विकास, ज्ञानाची वृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकास यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित या उपक्रमात सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा.

कार्यक्रमाचे वेळापत्रक :

स्थळ : महाविद्यालयाचे सभागृह
सकाळी १०.३० ते १०.४५- भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन.
सकाळी १०.४५ ते ११.००- निर्धारित मजकुराचे सामूहिक वाचन.

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

उंब्रज, ता.-कराड, जि.- सातारा



ग्रंथालय विभाग

आयोजित

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त



डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

वाचन प्रेरणा दिन

विशेष व्याख्यान-२०२६

॥ वाचू आनंदे ॥





मार्गदर्शक

प्रा. अनंत अर्जुन निकम

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

ग्रंथ आमचे साथी
ग्रंथ आमचे हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या
अंधाऱ्या राती



कार्यक्रमाचे अध्यक्ष

प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे

सहसचिव (उ. शि.) रयत शिक्षण संस्था, सातारा
प्राचार्य, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

आयोजक

प्रा. विकास बर्गे (ग्रंथपाल)





प्र. प्राचार्य

डॉ. संभाजी गावडे



स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

शुक्रवार, दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२६ **वेळ : सकाळी १०.०० वा.**

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,

उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

“विशेष व्याख्यान-२०२६”

कार्यक्रमात


आपल्या सर्वांचे





प्रदर्शन स्थळ: मुख्य सभागृह, दुसरा सभागृह

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम





"अपयश नावाच्या रोगाचा मुकाबला करण्यासाठी 'आत्मविश्वास' आणि 'अथक परिश्रम' हे सर्वोत्तम औषध आहे."

-डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

भारताचे राष्ट्रपती, मिसाईल मॅन,

भारतरत्न, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम



यांच्या जयंतीनिमित्त

ग्रंथालय विभाग

आयोजित

“वाचन प्रेरणा दिन -२०२६”

शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर, २०२६, वेळ: सकाळी १०.०० वा.

॥ वाचू आनंदे ॥

मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे
अध्यक्ष
सहसचिव (उ. शि.)
रयत शिक्षण संस्था, सातारा

मा. प्रा. अनंत निकम
मार्गदर्शक
विभागप्रमुख, संस्कृत विभाग,
एस. जी. एम. कॉलेज, कराड

प्रमुख उपस्थिती

मा. प्रकाश चव्हाण	मा. जयंत जाधव	मा. चंद्रकांत चव्हाण
मा. तानाजी कदम	मा. प्रल्हाद जाधव	मा. दिनेश कदम
मा. वैभव उमरदंड	मा. सौ. सुनिता पाटील	मा. सौ. फातिमा पटेल



प्रा. विकास बर्गे	प्रा. घनश्याम गिरी	डॉ. संभाजी गावडे
ग्रंथपाल	उपप्राचार्य	प्र. प्राचार्य



रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ **दिनांक: १२/१०/२०२६**

प्रति,

मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे

सहसचिव, उच्च शिक्षण विभाग

रयत शिक्षण संस्था, सातारा.

विषय : "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याबाबत....

महोदय,

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही "वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यात येत आहे. वाचन हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून ते व्यक्तीच्या विचारांना दिशा देणारे, संवेदनशीलता वाढविणारे आणि व्यक्तिमत्त्व समृद्ध करणारे माध्यम आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि "वाचू आनंदे" ही भूमिका त्यांच्या मनात रुजावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या सेवेत तीन दशकांहून अधिक काळ मराठी विषयाचे उत्तम दर्जाचे अध्यापन करणारे अभ्यासू व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, तसेच आपल्या कार्यातून आदर्श प्राचार्यांची वेगळी ओळख निर्माण करणारे आणि रयतच्या सेवेला आपले जीवन समर्पित करणारे आदर्श रयतसेवक म्हणून आपले व्यक्तिमत्त्व आम्हा सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी राहिले आहे. शिक्षण, वाचन, साहित्य आणि विद्यार्थी विकास या सर्वांशी असलेली आपली नाळ लक्षात घेता, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आपण भूषवावे, ही आमची मनापासूनची इच्छा आहे.

आपल्या अनुभवसमृद्ध अध्यक्षीय मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व केवळ ऐकायला मिळणार नाही, तर वाचनाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी मिळेल, असा आम्हांस विश्वास आहे. आपल्या अभ्यासपूर्ण विचारांची आणि प्रेरणादायी उपस्थितीची या कार्यक्रमाला लाभलेली साथ कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण, संस्मरणीय आणि दर्जेदार स्वरूप प्राप्त करून देईल, याची आम्हांस खात्री आहे. तरी आपण आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ देऊन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आवर्जून उपस्थित राहावे व आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही नम्र विनंती. आपली उपस्थिती म्हणजे केवळ अध्यक्षीय उपस्थिती नव्हे, तर रयतच्या ज्ञानपरंपरेला, वाचन संस्कृतीला आणि विद्यार्थी-केंद्री शिक्षणाला मिळणारे प्रेरणादायी पाठबळ आहे. आपण आवर्जून उपस्थित राहाल, या अपेक्षेसह...

कार्यक्रमाची माहिती:

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६

वेळ : सकाळी १०.०० वाजता

स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ **दिनांक: १६/१०/२०२६**

प्रति,

मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे

सहसचिव, उच्च शिक्षण विभाग

रयत शिक्षण संस्था, सातारा.

विषय : वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केल्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार.....

आदरणीय सर,

सप्रेम नमस्कार, शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रमास आपण अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून आम्हाला अनमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार! मराठी विषयाचे तीन दशकांहून अधिक काळ समर्पित भावनेने अध्यापन करणारे अभ्यासू प्राध्यापक, आदर्श प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेच्या कार्याशी निष्ठेने जोडलेले एक कर्तव्यदक्ष रयतसेवक म्हणून आपला शैक्षणिक प्रवास आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आपल्या अनुभवाचा, विचारांचा आणि समृद्ध शैक्षणिक दृष्टिकोनाचा लाभ आमच्या महाविद्यालयाला मिळणे, ही आमच्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून वाचनाचे महत्त्व, ज्ञानाची साधना आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील वाचनाचे स्थान अधिक प्रभावीपणे अधोरेखित झाले. आपल्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला केवळ औपचारिक प्रतिष्ठा लाभली नाही, तर त्याला वैचारिक समृद्धी आणि प्रेरणादायी अर्थ प्राप्त झाला. आपण आपल्या व्यस्त कार्यातून वेळ काढून या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलात, ही आमच्यासाठी विशेष आनंदाची बाब आहे. प्रशासकीय जबाबदाऱ्यांचे मोठे ओझे सांभाळतानाही वाचन, लेखन आणि ज्ञानसाधनेशी असलेली आपली नाळ कायम असल्याचे जाणवते. अशा व्यक्तिमत्त्वाचा सहवास आणि मार्गदर्शन मिळणे, ही आमच्यासाठी निश्चितच मोलाची शिदोरी आहे. आपल्या सहकार्यामुळे आणि मार्गदर्शनामुळे आमच्या महाविद्यालयातील वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी नवी प्रेरणा मिळाली आहे. आपले हे स्नेहपूर्ण सहकार्य यापुढेही आम्हाला लाभत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुन्हा एकदा आपले मनःपूर्वक आभार!

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ **दिनांक: १२/१०/२०२६**

प्रति,

मा. प्रा. अनंत अर्जुन निकम
विभागप्रमुख, संस्कृत विभाग
सद्गुरू गाडगेमहाराज कॉलेज, कराड.

विषय : "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रमात "वाचू आनंदे" या विषयावर विशेष व्याख्यान देण्याबाबत.....

महोदय,

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे यावर्षीही आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने "वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचनातून ज्ञान, विचार आणि विवेक विकसित करणे तसेच वाचन संस्कृतीला चालना देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या निमित्ताने आपल्या अभ्यासपूर्ण आणि प्रभावी वक्तृत्वाचा लाभ आमच्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना मिळावा, या हेतूने आपण "वाचू आनंदे" या विषयावर विशेष व्याख्यान देण्यासाठी उपस्थित राहावे, अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे भूषविणार आहेत. तरी आपण आमचे निमंत्रण स्वीकारून कार्यक्रमास उपस्थित राहावे व आपल्या विचारांनी विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरित करावे, ही नम्र विनंती. आपल्या व्याख्यानाचा लाभ आमच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा आम्हांस विश्वास आहे.

कार्यक्रमाची माहिती:

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६
वेळ : सकाळी १०.०० वाजता
स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ **दिनांक: १६/१०/२०२६**

प्रति,
मा. प्रा. अनंत अर्जुन निकम
विभागप्रमुख, संस्कृत विभाग
सद्गुरू गाडगेमहाराज कॉलेज, कराड.

विषय : वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात "वाचू आनंदे" या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केल्याबद्दल आभार....

आदरणीय सर,

सप्रेम नमस्कार, शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रमात आपण "वाचू आनंदे" या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून केलेल्या अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी मार्गदर्शनाबद्दल आपले मनःपूर्वक आभार. वाचन ही केवळ माहिती मिळविण्याची प्रक्रिया नसून आनंद, आत्मचिंतन, विचारसमृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा एक सुंदर प्रवास आहे. आपल्या व्याख्यानातून वाचनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी, पुस्तकांशी मैत्री करण्याची प्रेरणा आणि वाचनाचा आनंद अनुभवण्याची जाणीव उपस्थितांना मिळाली.

आपण आपल्या विचारांतून वाचनाचे महत्त्व सहज, प्रभावी आणि हृदयस्पर्शी पद्धतीने उलगडून दाखविले. आपल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या मनात पुस्तकांविषयी कुतूहल निर्माण होण्यास, वाचनाची गोडी वाढण्यास आणि ज्ञानाच्या नव्या वाटा शोधण्यास निश्चितच मदत होईल, असा आम्हाला विश्वास आहे. आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून आमच्या महाविद्यालयाचे निमंत्रण स्वीकारले आणि ज्ञानदानाच्या या उपक्रमात मनापासून सहभाग घेतला, याबद्दल आम्ही आपले विशेष ऋणी आहोत. आपल्या अनुभवाचा आणि अभ्यासपूर्ण विचारांचा लाभ आमच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मिळणे, ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. आपण दिलेली प्रेरणा केवळ या कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात वाचनाची सवय निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी आम्हाला आशा आहे. आपल्या अमूल्य वेळेबद्दल, स्नेहपूर्ण सहकार्याबद्दल आणि ज्ञानसमृद्ध मार्गदर्शनाबद्दल पुन्हा एकदा मनःपूर्वक धन्यवाद. आपल्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ दिनांक: १२/१०/२०२६

प्रति,

मा. मुख्याध्यापक,

म. गांधी माध्यमिक विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज,

उंब्रज.

विषय : वाचन प्रेरणा दिनानिमित्त "वाचू आनंदे" या विषयावर विशेष व्याख्यानास उपस्थित रहाणेविषयी निमंत्रण पत्र..

आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा केला जाणार आहे. हा शुभदिन शुक्रवार, दि. १६/१०/२०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे अध्यक्षतेखाली आणि सद्गुरू गाडगेमहाराज कॉलेज, कराड येथील संस्कृत विभागाचे विभागप्रमुख प्रा. अनंत निकम यांच्या " वाचू आनंदे" या विषयावरील विशेष व्याख्यानाने संपन्न होणार आहे. तरी आपली शाखा रयत संकुल उंब्रजचा महत्वाचा भाग असल्याने, आपल्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर सेवक यांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही नम्र विनंती. या व्याख्यान कार्यक्रमाचा निश्चितच आपल्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांना लाभ होईल. अशी आम्हास खात्री आहे.

कार्यक्रमाबाबतची माहिती :

१. शुक्रवार, दि. १६ /१०/२०२६

२. स्थळ: मुख्य सभागृह, दुसरा मजला

३. वेळ: सकाळी १०.००

"वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे."

मुख्याध्यापक
म. गांधी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

Librarian
Sou. Mangaltai Ramchandra Jagtap
Mahila Mahavidyalay,Umbraj
Tal.Karad, Dist.Satara.

I/C Principal
Sou. Mangaltai Ramchandra Jagtap
Mahavidyalaya, Umbraj
Tal. Karad, Dist. Satara.

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ दिनांक: १२/१०/२०२६

प्रति,

मा. मुख्याध्यापक,

श्रीमती रुक्मिणीबाई पांडुरंग कदम कन्या विद्यालय,

उंब्रज.

विषय : वाचन प्रेरणा दिनानिमित्त "वाचू आनंदे" या विषयावर विशेष व्याख्यानास उपस्थित रहाणेविषयी निमंत्रण पत्र..

आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा केला जाणार आहे. हा शुभदिन शुक्रवार, दि. १६/१०/२०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे अध्यक्षतेखाली आणि सद्गुरू गाडगेमहाराज कॉलेज, कराड येथील संस्कृत विभागाचे विभागप्रमुख प्रा. अनंत निकम यांच्या " वाचू आनंदे" या विषयावरील विशेष व्याख्यानाने संपन्न होणार आहे. तरी आपली शाखा रयत संकुल उंब्रजचा महत्वाचा भाग असल्याने, आपल्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर सेवक यांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही नम्र विनंती. या व्याख्यान कार्यक्रमाचा निश्चितच आपल्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांना लाभ होईल. अशी आम्हास खात्री आहे.

कार्यक्रमाबाबतची माहिती :

१. शुक्रवार, दि. १६ /१०/२०२६

२. स्थळ: मुख्य सभागृह, दुसरा मजला

३. वेळ: सकाळी १०.००

Received.
Patil

"वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे."

Librarian
Sou. Mangaltai Ramchandra Jagtap
Mahila Mahavidyalay,Umbraj
Tal.Karad, Dist.Satara.

I/C Principal
Sou. Mangaltai Ramchandra Jagtap
Mahavidyalaya, Umbraj
Tal. Karad, Dist. Satara.

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



जावक क्र.: समक्ष/२०२६-२०२७ दिनांक: १२/१०/२०२६

प्रति,
मा. मुख्याध्यापक,
रयत इंग्लिश मिडियम स्कूल,
उंब्रज.

विषय : वाचन प्रेरणा दिनानिमित्त "वाचू आनंदे" या विषयावर विशेष व्याख्यानास उपस्थित रहाणेविषयी निमंत्रण पत्र..

आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा केला जाणार आहे. हा शुभदिन शुक्रवार, दि. १६/१०/२०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे अध्यक्षतेखाली आणि सद्गुरू गाडगेमहाराज कॉलेज, कराड येथील संस्कृत विभागाचे विभागप्रमुख प्रा. अनंत निकम यांच्या " वाचू आनंदे" या विषयावरील विशेष व्याख्यानाने संपन्न होणार आहे. तरी आपली शाखा रयत संकुल उंब्रजचा महत्वाचा भाग असल्याने, आपल्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर सेवक यांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, ही नम्र विनंती. या व्याख्यान कार्यक्रमाचा निश्चितच आपल्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांना लाभ होईल. अशी आम्हास खात्री आहे.

कार्यक्रमाबाबतची माहिती :

१. शुक्रवार, दि. १६ /१०/२०२६
२. स्थळ: मुख्य सभागृह, दुसरा मजला
३. वेळ: सकाळी १०.००

"वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे."

Librarian
Sou. Mangaltai Ramchandra Jagtap
Mahila Mahavidyalay,Umbraj
Tal.Karad, Dist.Satara.

I/C Principal
Sou. Mangaltai Ramchandra Jagtap
Mahavidyalaya, Umbraj
Tal. Karad, Dist. Satara.

Received
12/10/2026

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

उंब्रज, ता.-कराड, जि.- सातारा



भारताचे राष्ट्रपती, मिसाईल मॅन,

भारतरत्न, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम



यांच्या जयंतीनिमित्त **ग्रंथालय विभाग** आयोजित

"वाचन प्रेरणा दिन -२०२६"

कार्यक्रम पत्रिका

प्रतिमा पूजन	**मान्यवरांच्या हस्ते**
स्वागतगीत	**गायक समूह**
प्रास्ताविक व मान्यवरांचा परिचय	**प्रा. विकास बर्गे**
प्रमुख मार्गदर्शक	**मा. अनंत निकम** विभागप्रमुख, संस्कृत विभाग, एस. जी. एम. कॉलेज, कराड
अध्यक्ष	**मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे** सहसचिव (उ. शि.) रयत शिक्षण संस्था, सातारा
उपस्थिती	**मा. प्र. प्राचार्य डॉ. एस. एम. गावडे**
आभार	**मा. जी. ए. गिरी**
सूत्रसंचालक	**डॉ. संध्या पोतदार**

स्थळ : सभागृह, दुसरा मजला

शुक्रवार, दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२६ **वेळ : सकाळी १०.०० वा.**

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,

उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

"विशेष व्याख्यान-२०२६"


कार्यक्रमात

आपल्या सर्वांचे

"हार्दिक स्वागत!"

प्रदर्शन स्थळ: मुख्य सभागृह, दुसरा सभागृह

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम



"अपयश नावाच्या रोगाचा मुकाबला करण्यासाठी 'आत्मविश्वास' आणि 'अथक परिश्रम' हे सर्वोत्तम औषध आहे."

-डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

भारताचे राष्ट्रपती, मिसाईल मॅन,



भारतरत्न, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

यांच्या जयंतीनिमित्त

ग्रंथालय विभाग

आयोजित

"वाचन प्रेरणा दिन -२०२६"

शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर, २०२६, वेळ: सकाळी १०.०० वा.

मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे
अध्यक्ष
सहसचिव (उ. शि.)
रयत शिक्षण संस्था, सातारा

मा. प्रा. अनंत निकम
मार्गदर्शक
विभागप्रमुख, संस्कृत विभाग,
एस. जी. एम. कॉलेज, कराड

प्रमुख उपस्थिती

मा. प्रकाश चव्हाण	मा. जयंत जाधव	मा. चंद्रकांत चव्हाण
मा. तानाजी कदम	मा. प्रल्हाद जाधव	मा. दिनेश कदम
मा. वैभव उमरदंड	मा. सौ. सुनिता पाटील	मा. सौ. फातिमा पटेल

प्रा. विकास बर्गे	प्रा. घनश्याम गिरी	डॉ. संभाजी गावडे
ग्रंथपाल	उपप्राचार्य	प्र. प्राचार्य

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज.



ग्रंथालय विभाग

१५ ऑक्टोबर



भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम

यांच्या जयंती निमित्त आयोजित,


"वाचन प्रेरणा दिन"


भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक




पद्मश्री.डॉ.एस.आर.रंगनाथन

ग्रंथ म्हणजे मन निर्मळ करणारा **अविश्रांत** झरा आहे.















शुभेच्छुकः सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" शिक्षक उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	शिक्षकाचे नाव	विषय/विभाग	सही
१	डॉ राजू लोखंडे	इतिहास	
२.	प्रा. विकास विलास कांबळे	ग्रंथालय	
३.	प्रा. डॉ. भोगे दिगंबर भागवत	अर्थशास्त्र	
४	प्रा. वाईकर [illegible]	[illegible]	
5	प्रा. डॉ. पाटील विनय पांडुरंग	मराठी	
6	प्रा. देसाई [illegible] विक्रमसिंह	मराठी	
7	प्रा. गिरी जी. ए.	मराठी	
8	डॉ. निंबाळकर के. एम.	हिंदी	
9	Mr. N.T. Phase	English	
10	Dr. T.S. Thorat	Sociology	
11	Jamdade N.P.	HIS	
12	Sargar S.B.	History	
13	Jadhav S.M.	History	
14	Prof Gurav P.V.	Microbiology	
15)	Prof. Patare P.S.	chemistry	
16)	Prof. Jadhav M.S.	—u—	
17)	Prof Tate Gurav M.A	Zoology	
19)	Dr. Jahangir A. Mulani	English	
20)	Dr. Sandhya Sunil Patdar	English	
21)	Prof. Salunkhe Madhuri Shankarrao	English	
22)	Prof. Desai Pallavi Sumit	Commerce	
23)	Prof. Tupe Aasha Pandharinath	Commerce	
24)	Prof. Raviraj Sambhaji Yadav	Economics	
25)	Prof. M. V. Vanmekare	Hindi	

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" शिक्षक उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	शिक्षकाचे नाव	विषय/विभाग	सही
1	Mrs. Kazi T.S.	English	
2	Mrs. Tate K.A.	Maths	
3)	Ghatge S.R.	English	
4.	Yelave R.G.	English	
5.	Kadam R.R.	English	
6.	Jadhav A.G.	Maths	
7.	Suryawanshi V.K.	Hindi	
8.	Kadam P.L.	English	
9.	Deshmukh V.R.	Hindi	Deshmukh
10.	Patil A.S.	SST	
11.	Mrs. Dhebe R.M.	English	
12.	Salunkhe S.R	Marathi	
13.	Kamble J.S	English	
14	Jadhav S.M.	Maths	
15	Mrs. Ghute S.A.	Computer	
16	Mrs Barde P.A	Computer	
17	Mr. Jadhav Sujit Sudhir	Science	
18.	Mr. Hirave P.G	Marathi	
19.	Mr. Lokhande H.R.	History	
20.	Smt. Salukde V.L.	Sociology	
21	Patil N.N.	Hindi	

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	सही
1)	सादिक अयुब सय्यद	B.com II	Sadik
2)	प्रथमेश आनंदा जाधव	B.com II	
3)	विक्रेश आनंदा जाधव	B.com II	
4)	चव्हाण वेदांत	B.S.C.I	
5)	शिंदे सुमित	B.Sc.I	S.S.Shinde
6)	आकाश रोहिदास साळुंखे	B.Sc.I	
7)	रुत विठ्ठल कुरुटे.	B.com II	
8)	[illegible]	B.Com I	
9)	साहिल दयानंद टिळेकर	II वी Art	S.D.T.
10)	रोहित युवराज चव्हाण.	II वी Art	R.Y.C
11)	अनिकेत श्रीरंग टोके	II वी Arts	
12)	समर्थ झुंजार	II वी Artist	
13)	कार्तिक भोसले	II वी arts	
14)	राहुल आनंदा जाधव	II वी Art+Craft	
15)	[illegible]	D.S.E	
16)	रघुराज साळुंखे	II वी Art.	S.J.S
17)	सार्थक माळी	II वी Art	
18)	[illegible]	II वी Art	
19)	आनंद चव्हाण	II वी Art	
20)	वीर घाडगे	II वी Art	
21)	सुभहान मुल्ला	II वी Art	
22)	नयन सुतार	II वी Art	
23)	आदित्य शेलार	II वी Art	A.G.T.

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	सही
1.	Sakshi vishwanath salunkhe	B.Com II	S.v.salunkhe.
2.	Shreya Maruti Shejval	B.Com II	S.M.Shejval
3	Prachi Kishor chavan	B.com I	Prachi
4	Gayatri Vikas mane	B.com I	Gmane
5.	Nandini Santosh Bongane	B.Com I	NBongane
6	Tanvi Anil Ghadage	B.Com II	Tanvi
7	Jadhav Diksha Balkrushna	B.COM II	Jadhav
8	Shramika Subhash budhe	B.COM II	Sbudhe
9	Mulla Ekra Sikandar	BSC I	Mulla
10	Ghadge Asmita Ramchandra	BSC I	AGhadge
11	Mansi Kailas Mohite	B.com III	MMohite
12	Sanjana Santosh Bamane	B.com III	Bamane
13	Jadhav Sakshi Shankar	B.S.C I	S.S.Jadhav
14	Ghadage Nisha Sanjay	B.S.C I	Ghadage
15	Patil Pallavi vinod	B.S.C I	P.V.Patil
16.	Patil Amruta Sanjay	B.SC.I	Spatil.
17	Pawar Vrushali Vasant	B.com.II	Pawar

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	वर्ग	सही
1.	अर्जुवाडे ईश्वरी विक्रम	9th C	
2.	प्राजक्ता सतीश बाबडेकर	9th	
3.	पूर्वा नितीन भोसले	9th	Bhosale
4.	आराध्या अंकुश चव्हाण	9th	A.Ankush.
5.	नविष्का प्रशांत चव्हाण	9th	P.chavan
6.	काव्या अनिल धुमाळ	9th	K.A.Dhumal
7.	स्वरा संभाजी गायकवाड	9th	
8.	जीविका रवींद्र घाडगे	9th	GKadaye
9.	मुग्धा नारायण घाडगे	9th	Mghadage
10.	संचिता सचिन घाडगे	9th	Sanchita Ghadge
11.	भार्गवी संदीप घार्गे	9th	Ghare.
12.	जान्हवी दिपक हत्ते	9th	Jhatte
13.	अनुष्का सचिन इंगळे	9th	A.S.Ingle
14.	सिया दिपक जाधव	9th	Jadhav.
15.	वेदिका अनिल जाधव	9th	Rajadhav.
16.	भक्ती समाधान कदम	9th	B.S.kadam
17.	साक्षी किरण जगदाळे	9th	
18.	आदिती जालिंदर साळुंखे	9th	A.J.S.
19.	साक्षी मनोज कडव	9th	Skadav.
20.	अनुष्का रामकृष्ण काटकर	9th	Akatkar.
21.	वैष्णवी प्रकाश मोहिते.	9th	Vishnavi
22.	सिद्धी संभाजी मोरे.	9th	S.S.More
23.	संचिता हनुमंत हत्ते	9th	Shatte

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	वर्ग	सही
24.	भक्ती संतोष जाधव	9th	B.S.Jadhav
25.	पलक मनोज जाधव	9th	Palakmj
26.	विनया नवनाथ जाधव	9th	Vinayaja
27	गोधी मोक्षिता राजीव	9th	Mrgandhi
28.	अनुष्का बजरंग घोरात	9th	Ghorat
29.	श्रद्धा श्रीपाद घोरात.	9th	Ghorat
30.	ईश्वरी विद्याधर भंडारे	9th	Ishwari
31.	काव्या राजेष घोरात	9th	K.R.Thorat
32.	दिक्षा दत्तात्रय घोरात	9th	Dthorat
33.	स्वरांजली योगेश पवार	9th	Spawar
34.	वेदांती रुपेश पाटील	9th	V.R.Patil
35.	संस्कृती सुनिल निकम	9th	Sanskruti
36.	आरती मेल्हा सालुंखे	9th	Aalunkhe
37.	राजवर्धिनी रविराज पाटील	9th	Rpatil
38.	सलोनी गणपती पायमल	9th	S.G.P
39.	धनश्री सावकार सूर्यवंशी	9th	
40.	ऋतुजा कृष्णात पवार	9th	Rpawar
41.	जान्हवी सतिश सालुंखे.	9th	Jsalunkhe
42.	बुधे प्रतीक्षा प्रकाश	9th	Budhe
43	सिद्दी सत्यवान घोरात	9th	Sthorat
44.	अक्षरा अर्जुन धाडगे	9th	Akshara G.
45	सई हर्षद कदम	9th	Sadk

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	वर्ग	सही
46	वैष्णवी संतोष ओसात	9th	Vaibhavi
47	सिद्धी सत्यवान ओसात	9th	S.S.T
48	अनुष्का गणेश यादव	9th	A.G.yadav
49	आराध्या प्रशांत यादव	9th	Ayadav
50	सई महेश यादव	9th	yadavsai
51	स्वराजश्री संतोष कुंभार	9th	Shubhan
52	सई दिपक शेटे	9th	Dshete
53	तनिष्का सागर उकिर्डे	9th	Tanishka
54	दुर्वा बाबासो देटके	9th	Durva
55	आराधना युवराज गव्हाळे	9th	A.Y.Gavhale
56	शामल निलेश गव्हाळे	9th	Gavhale
57	वैष्णवी उमेश कांबळे	9th	Vaishnavi
58	वैदवी दत्तसिंग हजारे	9th	Vaidavi
59	भाग्यश्री नवनाथ शिंदे	9th	B.N.Shinde
60	अदिती सुनिल अडसुळे	9th	Aditi
61	श्रावणी सचिन जाधव	9th	Shravani
62	मुग्धा नारायण घाडगे	9th	Ghadage
63	जाधव वेदिका अजित	9th	Vedika
64	शर्वरी ज्ञानेश्वर साळुंखे	9th	Sharvari

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	सही
1)	वैभवी सुनिल मोहिते	II A	Mohite
2)	सुहाना रियाज मुलानी	II A	S.R.mulani.
3)	सृष्टी सतीश भोसले	II A	Bhos.
4)	वैष्णवी हणमंत आवटे	II A	V.H.A
5)	गायत्री उमेश बोरगे	II A	G.U.Borge
6)	आकांक्षा आनंदराव अडांरे	II A	A.A.B.
7)	शर्वरी माणिकचंद वायाळ	II A	S.M.Wayal
8)	साधना विलास जावळे	II A	S.V.Jawale
9)	देविका विष्णू लोहार	II A	Lohar
10)	प्राची अधिक लोहार	II A	P.A.Lohar
11)	दिगंबर गणेश डांगे	II A	D.G.Dange
12)	मानस विजय जाधव	II A	M.V.Jadhav
13)	सोमुराज जयवंत सांळुखे	II A	S.J.S
14)	सुबहान आरिफ मुल्ला	II A	Aarifulla
15)	नयन भरत सुतार	II A	Nayan
16)	मधुर उमेश परदेशी	II A	M.U.P.
17)	रोहित युवराज चव्हाण	II A	R.Y.C
18)	अजित अनिल राठोड	II A	Rathod.
19)	दिक्षा कृष्णात जाधव	II A	D.K.Jadhav
20)	ईश्वरी भगवान पुजारी	II A	Pujwari.B.P.
21)	अनुजा सुखदेव बलवादी	II A	Abalwadi.
22)	स्वराजली जुहास मोरे	II A	Swarajali
23)	रिद्धी मनिल जाधव	II A	Rathor ..

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	सही
24)	विकास सुभाष जाधव	II A	V.S.J
25)	साहिल दयानंद टिळेकर	II A	S.D.T
26)	सानिकेत श्रीरंग रोकडे	II A	Atok
27)	सादित्य संतोष खाकळे	II A	A.S.S
28)	साकिब मोसिम मुल्ला	II A	S.M.M
29)	गणेश आप्पा गायकवाड	II A	G.A.G.
80)	सादित्य जगपत पोरात	II A	A.G.T
31	आर्या जगन्नाथ कदम	II B	AJKadam
32	सुहाना रमजान मुलाणी		Suhana
33	श्रावणी राजेंद्र पाटील		SRPatil
34	वर्षा बाळासाहेब चव्हाण		V.B.Chavan
35	प्रेया शहाजी यादव		S.S.Yadav
36	श्रावणी शंकर जाधव		Shravani
37	राधा हणमंत साळुंखे		Saalunkhe
38	निलम निलेश कोबळे		Nilam K
39	मधुरी वैभव साळुंखे		MSaal
40	तनुजा अमोल हजारे		Tanuja
41	अंकिता पंढरीनाथ मुचंदेशी		AP
42	श्वेता धनाजी गोडसे		Shetas
43	मृणाल उदय निकम		Mrud
44	वैष्णवी विठ्ठल हजारे		V
45	सोहती सुनिल बोत्रेक		Sohe
46	मेघा हणमंत पवार		M.H.Pawar

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	वर्ग	सही
47	हर्षदा शहाजी झाकेर	II B	H.S.Shakar
48	दिव्या दिपक देवकर		D.D.Devkar
49	अनुष्का जालिंदर जाधव		A.J.J
50	सेजना शिवाजी पवार		
51	सतेश संजय सोनावले		
52	आर्यन उदधव गायकवाड		
53	तुकाराम रामकिशन पात्रे		T.R.Patre
54	सुशोन प्रविण हिरवळे		P.H
55	विघ्नेश अरुण चव्हाण		V.A.Chavan
56	शुभम भिमराव डोंगळे		
57	अथर्व अविनाश पवार		
58	साई अविनाश तटले		
59	नैतिक प्रविण जाधव		
60	अंजली तुकाराम महाबळ		
61	सृष्टी विश्वास शिंदुक		S.V.S
62	सेजना संदिप वीर		
63	अनुष्का नवनाथ बोलके		Abolake
64	पूजा विकास धाडगे		P.V.G
65	अपेक्षा अनंत वेरकर		A.A.Varekar
66	प्राजक्ता निलिशन कोबळे		P.kamble

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	सही
	Sakshi ~~Vishwanath~~ Bolke	11 TH	Bolke
	Sanchita Harne	11 th	SeHarne
	Arya Kadam	11 th	AJKadam
	Harshada Bhakare	11 th	HSBhakare
	Megha Pawar	11th	M.H.Pawar
	Mrunal Nikam	11 th	Mkul
	ankita suryvanshi	11 th	AS
	Anushka Bolke	11th	Abolke
	Vaishnavi Hajare	11th	
	Shweta Godase	11 th	Sgodase
	Tanuja. Hajare	11 th	Thajare.
	Shravni Gurav	11th	
	Apeksha Varekar	11 th	A.A.Varekar
	Prajkta kamble	11 th	Pkamble
	Pooja Gahadage	11 th	P.V.G.
	Riddhi Jadhav	11 th	Jadhav..
	Antara Nalawade	11th	AeN
	Prachi Lohar	11 th	P.A. Lohar
	Devika Lohar	11 th	Dlohar
	Aakanksha ~~Dh~~ Bhandare	11 th	Abhe
	Suhana mulani	11th	S.R.mulani
	Manaswi Yadav	11th.	MYadav.
	Gayatri Borge	11th	G.U.Borge

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा, ४१५१०९



ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिन" विद्यार्थी उपस्थिती पत्रक

दिनांक : शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६, स्थळ : मुख्य सभागृह, दुसरा मजला

वेळ : सकाळी १०.०० वाजता

अ. क्र.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ग	सही
1	सुबहान आरिफ मुल्ला	11 वी	Mulla
2	साहिल विद्याधर काबले	11 वी	Kamble
3	विकास सुभाष जाधव	11 वी	V.S.J
4	क्षणित राजेंद्र कालोखे	11 वी	
5	जयेश दिनकर पवार	11 वी	
6	मानस विजय जाधव	11 वी	M.V.J
7	जयेश प्रमोद घोडके	11 वी	J.P.G
8	अजय सयानंद किरतकर	11 वी	
9	आदित्य बाळासो घोरात	11 वी	A.G.T
10	नयने भरत कुंभार	11 वी	

रयत शिक्षण संस्थेचे
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा, ४१५११०९



दिनांक: १६/१०/२०२६

ग्रंथालय विभाग

"वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित दोन दिवसीय कार्यक्रमाचा अहवाल"

कार्यक्रमाचे नाव- वाचन प्रेरणा दिन व 'वंदे मातरम्' सामूहिक वाचन उपक्रम
आयोजक- ग्रंथालय विभाग, सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज
कार्यक्रमाचे ठिकाण- सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज व उंब्रज रयत संकुल
कार्यक्रमाचा कालावधी- दि. १५ व १६ ऑक्टोबर २०२६
प्रमुख मार्गदर्शक- प्रा. अनंत निकम, संस्कृत विभागप्रमुख, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
कार्यक्रमाचे अध्यक्ष- मा. जयंत जाधव, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व इतिहासशास्त्राचे संग्राहक
एकूण उपस्थिती- ४३ शिक्षक व २०३ विद्यार्थी

१. प्रस्तावना

वाचन ही व्यक्तीच्या ज्ञानवृद्धीची, वैचारिक प्रगल्भतेची आणि व्यक्तिमत्त्व विकासाची मूलभूत प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ग्रंथांशी त्यांचे नाते दृढ व्हावे, भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख व्हावी आणि वाचनसंस्कृतीचा प्रसार व्हावा, या उद्देशाने सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने दि. १५ व १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राच्या पत्र क्र. SU/BBK KRC/वाचन प्रेरणा दिन/2026/1257, दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ अन्वये विद्यापीठाच्या सूचनांनुसार विविध वाचनविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच उंब्रज रयत संकुलातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२. पहिला दिवस : दि. १५ ऑक्टोबर २०२६- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती व 'वंदे मातरम्'चे सामूहिक वाचन

गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ज्ञान, विज्ञान, शिक्षण आणि वाचन यांना महत्त्व देणाऱ्या डॉ. कलाम यांच्या विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानार्जनाची प्रेरणा निर्माण करण्याचा संदेश या निमित्ताने देण्यात आला. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या १५० वर्षांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमात विशेष सामूहिक वाचन उपक्रम आयोजित करण्यात आला. श्री. मिलिंद सबनीस लिखित 'समग्र वंदे मातरम्-खंड एक : इतिहास' या पुस्तकातील शिवाजी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या 'वंदे

मातरम्'विषयक मजकुराचे सामूहिक वाचन करण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांतील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला. सामूहिक वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा ऐतिहासिक संदर्भ, त्यामागील राष्ट्रीय भावना आणि देशभक्तीचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली. वाचनाच्या माध्यमातून राष्ट्रीय विचारांची जपणूक आणि ऐतिहासिक वारशाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू होता.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील निर्धारित मजकुराचे सामूहिक वाचन करण्याचा अनुभव मिळाला. तसेच वाचन हे केवळ परीक्षेपुरते मर्यादित न राहता इतिहास, संस्कृती, राष्ट्रीय भावना आणि सामाजिक जाणीव समृद्ध करणारे प्रभावी माध्यम आहे, हा विचार अधोरेखित झाला.

३. दुसरा दिवस : दि. १६ ऑक्टोबर २०२६- 'वाचू आनंदे' विशेष व्याख्यान

वाचन प्रेरणा दिनाच्या उपक्रमाचा पुढील भाग म्हणून शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी उंब्रज रयत संकुलातील विविध शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी 'वाचू आनंदे' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. म. गांधी माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, श्रीमती रुक्मिणीबाई पांडुरंग कदम कन्या विद्यालय आणि रयत इंग्लिश मीडियम स्कूल या संस्थांतील विद्यार्थी व शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथील संस्कृत विभागप्रमुख प्रा. अनंत निकम यांनी या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानातून वाचनाचे महत्त्व, वाचनातून होणारी ज्ञानवृद्धी, विचारांची समृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकास यांविषयी सविस्तर विवेचन केले. विविध क्षेत्रांतील उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी वाचनाचा व्यक्तीच्या जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.

भारतीय ज्ञानपरंपरेचा गौरवपूर्ण इतिहास स्पष्ट करताना त्यांनी भारतातील प्राचीन ज्ञानसंपदा, ग्रंथपरंपरा आणि ज्ञानाविषयी असलेली आत्मीयता यांचे महत्त्व अधोरेखित केले. भारतीय ज्ञानपरंपरा अत्यंत समृद्ध असून, ग्रंथ आणि ज्ञान यांना आपल्या संस्कृतीत पूर्वापार महत्त्वाचे स्थान आहे, ही बाब त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवली. आधुनिक काळातही पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नसून, वाचनामुळे व्यक्तीला नवीन विचार, विविध अनुभव आणि जीवनाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमातील पुस्तकांपुरते वाचन मर्यादित न ठेवता कथा, कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे, इतिहास, विज्ञान, साहित्य आणि भारतीय ज्ञानपरंपरेशी संबंधित ग्रंथांचेही वाचन करावे, अशी प्रेरणा त्यांच्या मार्गदर्शनातून मिळाली. वाचनाची सवय ही आयुष्यभर उपयोगी पडणारी संपत्ती असून, नियमित वाचनामुळे ज्ञान, विचारक्षमता आणि आत्मविश्वास वाढतो, हा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला.

'वाचू आनंदे' या विषयातून वाचन ही आनंददायी प्रक्रिया असून ती व्यक्तीला समृद्ध जीवनाकडे घेऊन जाते, ही भूमिका प्रभावीपणे मांडण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयी प्रेम निर्माण करणे आणि त्यांना वाचनासाठी प्रेरित करणे या दृष्टीने हे व्याख्यान उपयुक्त ठरले.

४. अध्यक्षीय मनोगत

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व इतिहासशास्त्राचे संग्राहक मा. जयंत जाधव उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले. "ज्याच्या हाती पुस्तक, जग होईल तिथेच नतमस्तक" हा त्यांचा संदेश कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला. पुस्तक हे ज्ञानाचे साधन असून, ज्ञानाच्या बळावर व्यक्ती स्वतःचा विकास करू शकते आणि समाजात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते, हा विचार त्यांच्या मनोगतातून व्यक्त झाला. विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करून स्वतःचे ज्ञान वाढवावे आणि आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासावी, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

५. मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संभाजी गावडे, म. गांधी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा. सुनीता पाटील, मा. फातिमा पटेल आणि मा. वैभव उमरदंड यांची विशेष उपस्थिती होती. उंब्रज रयत संकुलातील विविध शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. या दोन दिवसीय उपक्रमास उंब्रज रयत संकुलातील ४३ शिक्षक आणि २०३ विद्यार्थी, असे एकूण २४६ जण उपस्थित होते. विविध शैक्षणिक संस्थांतील शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग हा या कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग ठरला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांपर्यंत वाचनाचा संदेश पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम विशेष महत्त्वाचा होता.

६. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. विकास बर्गे यांनी केले. त्यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व, कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती विकसित करण्यासाठी ग्रंथालय विभाग करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. जी. ए. गिरी यांनी केले. त्यांनी प्रमुख मार्गदर्शक, कार्यक्रमाचे अध्यक्ष, उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संध्या पोतदार यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. दिगंबर भोगे, प्रा. रामराजे देशमुख, प्रा. निलेश जमदाडे, प्रा. शुभांगी लाड, प्रा. पल्लवी देसाई आणि प्रा. माया जाधव यांनी सहकार्य केले. ग्रंथालय विभागाच्या पुढाकाराने आणि शिक्षकांच्या सहकार्याने दोन्ही दिवसांचे उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पडले.

७. कार्यक्रमाची फलनिष्पत्ती

या दोन दिवसीय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना वाचनाचे शैक्षणिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाची प्रमुख फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रेरणा मिळाली.

२. 'वंदे मातरम्'च्या सामूहिक वाचनातून राष्ट्रीय गीताचा ऐतिहासिक संदर्भ आणि राष्ट्रीय भावनेचे महत्त्व अधोरेखित झाले.

३. भारतीय ज्ञानपरंपरा, ग्रंथसंपदा आणि वाचनसंस्कृती यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

४. वाचनामुळे ज्ञानवृद्धी, विचारांची प्रगल्भता आणि व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.

५. महाविद्यालयीन तसेच शालेय विद्यार्थ्यांना वाचनाच्या विविध प्रकारांची आणि त्यातून मिळणाऱ्या ज्ञानाची ओळख झाली.

६. उंब्रज रयत संकुलातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये वाचनविषयक उपक्रमांबाबत सहकार्य आणि सहभागाची भावना दृढ झाली.

७. ग्रंथालय हे केवळ पुस्तके उपलब्ध करून देणारे केंद्र नसून ज्ञानप्रसार, वाचनप्रेरणा आणि शैक्षणिक विकास यांना चालना देणारे महत्त्वाचे केंद्र आहे, ही भूमिका अधोरेखित झाली.

८. समारोप

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वाचन प्रेरणा दिन उपक्रम ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि विद्यार्थिकेंद्रित ठरला. पहिल्या दिवशी 'वंदे मातरम्'चे सामूहिक वाचन करून राष्ट्रीय भावनेची जाणीव दृढ करण्यात आली, तर दुसऱ्या दिवशी प्रा. अनंत निकम यांच्या 'वाचू आनंदे' या विषयावरील व्याख्यानातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे वैभव समजून घेण्याची संधी मिळाली. उंब्रज रयत संकुलातील ४३ शिक्षक आणि २०३ विद्यार्थ्यांचा सहभाग या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला. पुस्तकांशी मैत्री, नियमित वाचनाची सवय आणि ज्ञानार्जनाची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम उपयुक्त ठरला. अशा उपक्रमांच्या माध्यमातून वाचनसंस्कृती अधिक समृद्ध होण्यास आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळण्यास निश्चितच मदत होईल.

अहवाल सादरकर्ता,

प्रा. विकास बर्गे, ग्रंथपाल

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

ता. कराड, जि. सातारा.

ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

उंब्रज, ता. कराड, जि. सातारा



दिनांक: १५/१०/२०२६

ग्रंथालय विभाग

डॉ. ए. पी. जे अब्दुल कलम यांना अभिवादन करताना फोटो



‘वंदे मातरम् गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव (१५० वर्षे)’ या निमित्ताने श्री. मिलिंद सबनीस लिखित ‘समग्र वंदे मातरम्-खंड एक : इतिहास’ या पुस्तकातील विद्यापीठाने निश्चित केलेल्या मजकुराचे सामूहिक वाचन करताना महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी









ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५११०९

सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

उंब्रज, ता. कराड, जि. सातारा



दिनांक: १६/१०/२०२६

ग्रंथालय विभाग

वाचन प्रेरणा दिन-२०२६ क्षणचित्रे

































ग्रंथपाल
सौ. मं. रा. जगताप महाविद्यालय
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा
४१५१०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharashtranewslive @Maharashtranew1
October 19, 2026
Page no:2 | epaper.mahanewsnet.com

प्रा. अनंत निकम यांचे 'वाचू आनंदे' विषयावर प्रेरणादायी व्याख्यान

❊ महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

उंब्रज, दि. १८ ऑक्टोबर : वाचनसंस्कृती रुजविणे, विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथप्रेम निर्माण करणे आणि भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख करून देणे या उद्देशाने मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने दोन दिवसीय वाचन प्रेरणा दिन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस सर्वत्र वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आयोजित या उपक्रमात पहिल्या दिवशी वंदे मातरमचे सामूहिक वाचन, तर दुसऱ्या दिवशी वाचू आनंदे या विषयावर विशेष व्याख्यान घेण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राच्या निर्देशानुसार दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपक्रमाची सुरुवात



करण्यात आली. वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त (१५० वर्षे) श्री. मिलिंद सबनीस लिखित समग्र वंदे मातरम-खंड एक : इतिहास या पुस्तकातील विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वंदे मातरमविषयक मजकुराचे सामूहिक वाचन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभाग घेतला.

दुसऱ्या दिवशी उंब्रज रयत संकुलातील म. गांधी माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, श्रीमती रुक्मिणीबाई पांडुरंग कदम कन्या विद्यालय आणि रयत इंग्लिश मीडियम स्कूल येथील विद्यार्थ्यांसाठी सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथील संस्कृत विभागप्रमुख प्रा. अनंत निकम यांचे वाचू आनंदे या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात त्यांनी वाचनाचे महत्त्व विविध क्षेत्रांतील उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. भारतीय ज्ञानपरंपरा अत्यंत समृद्ध असून, भारतीय संस्कृतीत ग्रंथ आणि ज्ञानाला पूर्वापार महत्त्वाचे स्थान असल्याचे त्यांनी सांगितले. वाचनामुळे ज्ञानाचा विस्तार होतो, विचार प्रगल्भ होतात आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची आवड जोपासण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व इतिहासशास्त्राचे संग्राहक जयंत जाधव होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी ज्याच्या हाती पुस्तक, जग होईल तिथेच नतमस्तक हा मोलाचा संदेश देत पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संभाजी गावडे, सुनीता पाटील, मा. फातिमा पटेल आणि मा. वैभव उमरदंड यांची विशेष उपस्थिती होती. उंब्रज रयत संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. विकास बर्गे यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. जी. ए. गिरी यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. संध्या पोतदार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. दिगंबर भोगे, प्रा. रामराजे देशमुख, प्रा. निलेश जमदाडे, प्रा. शुभांगी लाड, प्रा. पल्लवी देसाई आणि प्रा. माया जाधव यांनी सहकार्य केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे, ग्रंथांशी मैत्री दृढ करणे आणि भारतीय ज्ञानपरंपरेविषयी अभिमान व जाणीव जागृत करण्याचा संदेश देण्यात आला.